# <u>नियमीत दिवाणी दावा क्र.२९८/२०२२ – निशाणी २१ खालील आदेश</u>

संजय रावसाहेब आगलावे वि. रासाहेब जयाप्पा आगलावे

CNR NO. MHSO20–001083–2022

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, वादीने प्रतिवादी विरूध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठीचा दाखल केला आहे. दाव्याचे कामी जमिन गट नंबर ३०८/४ ही मिळकत नजरचुकीने दाव्यात समाविष्ट झालेली असून जमिन गट नंबर ३०८/४ ही मिळकत दाव्यातून वगळणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच दावा कलम १ मधील अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेली जमिन गट नंबर १८६ मिळकतीबाबतचे वर्णन दाव्यातून वगळणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच दाव्यात प्रतिवादी नं. ३ ते ११ यांची नावे दाव्यातून वगळणे गरजेचे आहे. सदर प्रतिवादी हे गट नंबर १८६ या मिळकतीच्या ७/१२ उतारेवरील सहहिस्सेदार आहेत व जमिन गट नंबर १८६ ही विहिर मिळकत आहे. सबब प्रतिवादी क. ३ ते ११ हे दाव्याचेकामी आवश्यक पक्षकार नाहीत. तसेच दाव्याचे कामकाज चालु असताना दावा मिळकत जमिन गट नंबर ३०८/२ या मिळकतीचे ७/१२ उतारेमधील क्षेत्रामध्ये दुरूस्ती झालेली आहे. त्यामुळे दाव्यात दुरूस्ती होणे जरूरीचे झालेले आहे. वादीतर्फे सदरील अर्जाद्वारे दावा शिर्षकातील प्रतिवादी क. ३ ते ११ यांचे नावापुढे कंस करून सदर प्रतिवादींना दाव्यातून कमी करण्यास परवानगी असावी. दावा कलम १ मध्ये मिळकतीचे वर्णनामध्ये अ.क्र.३ मध्ये नमुद केलेला जमिन गट नंबर १८६ क्षेत्र ०हे–१६आर, आकार ०रू–२५पै, पैकी ०हे–०२आर, आकार ०रू–०३पै हा मजकुर दाव्यातून वगळण्याची परवानगी मिळावी. दावा कलम १ मध्ये मिळकतीचे वर्णनामध्ये नमूद केलेला जमिन गट नंबर ३०८/४ यास काट मारुन त्याठिकाणी जमिन गट नंबर १८६ असे लिहीण्यास, दावा कलम १ मध्ये अ.क्र.१ मध्ये वर्णन केलेली जमिन गट नंबर ३०८/२ या जमिन मिळकतीचे क्षेत्र १हे–३३आर च्या ऐवजी "१हे–२५आर" असे लिहिणेस तसेच "एकूण १–३९" यास काट मारणेची परवानगी मिळणेची विनंती केली. सदरील दावा दुरुस्ती ही तांत्रिक स्वरूपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे मांडले की, वादी व प्रतिवादी यांचे मध्ये आपसात तडजोडीने वाटप करणेचे ठरले आहे.

४.	दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीचे अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५.	वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेचा दाखल केलेला आहे. वादी तर्फे प्रस्तुत अर्जाद्वारे दावा मिळकतीसंबंधी व प्रतिवादी क्र.३ ते ११ यांची नावे दाव्यातून कमी करण्याबाबतीत दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे मांडून प्रस्तुत अर्जास हरकत घेतले नाही. सबब, सदरची दुरुस्ती होणे अत्यंत जरूरीचे आहे. तसे न झाल्यास वादीचे कधीही न भरून येणारे फार मोठे नुकसान होणार आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे आशयात व विषयात कसलाही बदल होत नाही. त्यामुळे सदर दाव्यात वादीने मागितलेली दुरुस्ती करणे जरुरीचे आहे.

६.	सदर दुरुस्ती पुरावा सुरु होण्यापूर्वी मागितली आहे. सदर दुरुस्ती तांत्रिक स्वरूपाची आहे. सदरची दुरुस्ती होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे त्याला अनुषंगून वादीने मागितलेली मागणी मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेकरीता वादीने मागणी केलेली दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरील दुरुस्तीमुळे दाव्याच्या आषयात व विषयात कोणताही बदल होणार नाही. ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज (नि.२१) मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादी यांनी अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करुन, दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.03.13 13:36:47 +0530

सांगोला.
दिनांक : १२/०३/२०२६

(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 13-03-2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 13-03-2026 |